# कामा रुग्णालायातील शहीदांना अखेर न्याय

मुंबईत २६-११ च्या झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले कामा रूग्णालयातील सुरक्षा रक्षक बबन उघडे आणि भानू नारकर यांना अखेर शासना २५ लाख रुपये सानुग्रह अनुदान व त्यांच्या कुटुंबियांना ७७९ चौरस फूटाची सदनिका विनामूल्य दिली आहे. त्याचबरोबर त्यांच्या वारसांना कामा रूग्णालयातच अनुकंपा तत्त्वावर नोकरी दिली गेली आहे. यासंदर्भातील पाठपुरावा तसेच प्रश्न विधानसभेत शिवसेना नेते व आमदार सुभाष देसाई यांनी मांडला होता. त्यावर पुनर्वसन मंत्री दिलीप देशमुख यांनी लेखी माहिती दिली.

दोघा सुरक्षा रक्षकांचे नाव शहीद जवानांच्या कुटुंबाच्या यादीत नसल्याची संदिग्धता निर्माण झाली होती. त्यामुळे त्याबाबतचा खुलासादेखील यानिमित्ताने झाला असल्याचे सुभाष देसाई यांनी म्हटले आहे. या दहशतवादी हल्ल्यात अनेकांना अद्यापही मदत मिळालेली नाही. त्याचबरोबर त्यांच्या आर्थिक मदतीच्या वाटपाचे नियोजनदेखील योग्य रित्या झाले की नाही, याची तपासणी करण्याची गरज आहे. यासंदर्भातील त्रूटींचा आढावा घेऊन लवकरच शासनाला आपण कळवणार असल्याचेही सुभाष देसाई यांनी म्हटले आहे.